# जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव

## जा ही र नि वि दा

जळगांव जिल्हयातील तमाम अधिकृत पुस्तक पुरवठा धारकांना या जाहीर निविदेव्दारे कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय जळगांव व त्यांचे अधिपत्याखालील तालुकास्तर न्यायालयांचे ग्रंथालयाकरीता भारत सरकार व्दारे नव्याने प्रसिध्द करण्यात आलेले भारतीय न्याय संहिता 2023, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 व भारतीय साक्ष अधिनियम 2023 या कायदयांची अद्ययावत अशी प्रोफेशनल पब्लीकेशनची इंग्रजी आवृत्तीची विधी पुस्तके खरेदी करावयाची आहे. तरी या कामी ज्या विधी पुस्तके विक्रेते यांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफयात म.जिल्हा न्यायाधीश ग्रंथालय कक्ष जळगांव या नावाने पाकीटावर विधी पुस्तकांसाठीचे दरपत्रक असे नमुद करुन पाकीट प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय जळगांव कक्ष क्रमांक 101 मध्ये **दिनांक 31/05/2024** पर्यंत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक **01/06/2024** रोजी सकाळी 10.30 वाजता म.जिल्हा न्यायाधीश –2 जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

**कार्यालयासाठी अद्ययावत इंग्रजी आवृत्तीची विधी पुस्तके खालील प्रमाणे उधारीवर खरेदी करावयाची आहेत.**

| अ.न. | तपशील | नग |
|---|---|---|
| 1 | **भारतीय न्याय संहिता, 2023,** | **90** |
| 2 | **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, 2023,** | **90** |
| 3 | **भारतीय साक्ष अधिनियम, 2023** | **90** |

1. उक्त इंग्रजी आवृत्तीची विधी पुस्तके ही केवळ प्रोफेशनल पब्लीकेशनचीच पुरवावे लागतील.
2. दरपत्रक स्विकारल्यानंतर उपरोक्त पुस्तके ही जिल्हा न्यायालयाचे ग्रंथालय कक्षात एकुण 15 दिवसाचे आत पुरविणेत यावीत.
3. सदरची पुस्तके चांगल्या प्रतीची व उच्च दर्जाची असावीत.
4. सदरची पुस्तके ही अद्ययावत असावीत. सदरची पुस्तके ही अद्ययावत नसल्यास पुस्तके परत केली जातील
5. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.जिल्हा न्यायाधीश–2 जळगांव यांच्याकडेस राखुन ठेवण्यात आलेला आहे.
6. दरपत्रकातील दर भरतांना सर्व करांसह भरावे. मात्र जीएसटी टॅक्स असल्यास त्याचा दर बिलात स्वतंत्र नमूद करावा.
6. सदरची खरेदी शासकीय नियमानुसार करण्यात येईल. सदर खरेदी कालावधीत शासनाचे काही नवीन नियम लागू केल्यास त्यानुसार खरेदी करण्यात येईल.
7. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठवि–यांनी प्रत्यक्ष हजर राहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा. अन्यथा त्यांचे गैरहजेरीत दरपत्रक उघडण्यात येईल.
8. उपरोक्त नमूद वस्तुंचा पुरवठा आदेश देवूनही पुरवठा मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा.जिल्हा न्यायाधीश–2 जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

DISTRICT COURT JALGAON

म.जा.क. /ग्रंथालय/सी–15/2606/2024
जिल्हा व सत्र न्यायालय जळगांव
दिनांक 21/05/2024

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय जळगांव

**प्रत माहीतीसाठी व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करीता**

1. म.जिल्हाधिकारी सो जळगांव
2. म.तहसिलदार सो जळगांव
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो /म.मुख्य न्यायदंडाधिकारी सो जळगांव
4. म.न्यायालय व्यवस्थापक, जिल्हा न्यायालय, जळगांव
5. अधिक्षक, कार्य व्यवस्थापन विभाग / सहा. अधिक्षक, रोख शाखा जिल्हा न्यायालय
6. जिल्हा व सत्र न्यायालय संकेतस्थळावर **ecourt.gov.in/jalgaon**